# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादीत, नाशिक

**१. महामंडळ निर्मिती :-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे.

**२. महामंडळाची स्थापना :-**

महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे.

**३. महामंडळाचा उद्देश :-**

अ) अनुसुचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्या मार्फत कृर्षी उद्योग, लघु उद्योग, वाहतुक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यामातुन योजना आखणे, प्रचलित करणे. मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे.

ब) आर्थिक स्थिती / पध्दती आणि उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि विपणन यांच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यात अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनविण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालु करण्यासाठी भांडवल कर्ज मिळविण्याची साधने समुग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय सहाय्य देण्याची तरतूद करणे.

क) वरील व्यतिरिक्त आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी योग्य ते आवश्यक वाटणारे इतर कार्य करणे.

**❖ शबरी महामंडळाचे संचालक मंडळाची रचना**

शासन निर्णय क्र.आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.३ मुंबई दि.९ डिसेंबर, १९९८ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | हुद्या |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २. | मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | उपाध्यक्ष |
| ३. | मा.सचिव, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ४. | मा.उप सचिव<br>आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ५. | मा.आयुक्त, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास, महराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक |
| ६. | मा.व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.)<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक | संचालक |

❖ **लाभार्थीची कर्ज प्रकरणे मंजुरीसाठी शाखा कार्यालय पातळीवरील गठीत करण्यात आलेली मुल्यमापन समिती ची रचना :-**

| अ.क्र. | तपशिल | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, | अध्यक्ष |
| २. | मा.संचालक,<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक | सदस्य |
| ३. | मा.प्रादेशिक व्यवस्थापक<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या, नाशिक | सदस्य |
| ४. | शाखा व्यवस्थापक<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, | सदस्य सचिव |

वरील प्रमाणे शाखा कार्यालय स्तरावर मुल्यमापन समिती गठीत करण्यात आलेली असून सदरची समिती शाखा कार्यालय पातळीवर प्राप्त झालेल्या प्रकरणाची तपासणी/छाननी तसेच लाभार्थीची प्रत्यक्ष मुलाखत घेवुन मुल्यमापन समिती शिफारस केल्यानुसार मुख्य कार्यालय स्तरावरुन लाभार्थीची कर्ज प्रकरणे मंजूर केली जातात.

❖ **राज्यातील एकूण कार्यालये :-**

अ) मुख्य व नोंदणीकृत कार्यालय, नाशिक

ब) शाखा कार्यालय व त्यांच्या अधिनस्त जिल्हे

| **अ.क्र.** | **शाखा कार्यालय** | **अधिनस्त कार्यक्षेत्र येणारे जिल्हे** |
|---|---|---|
| १. | नाशिक | नाशिक |
| २. | जव्हार (जि.पालघर) | पालघर, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मुंबई व उपनगरे |
| ३. | जुन्नर (जि.पुणे) | पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातुर, उस्मानाबाद, बीड |
| ४. | नंदूरबार | नंदूरबार, धुळे |
| ५. | यावल (जि.जळगांव) | जळगांव, औरंगाबाद, जालना, बुलढाणा |
| ६. | धारणी (जि.अमरावती) | अमरावती, अकोला |
| ७. | यवतमाळ | यवतमाळ, वाशिम |
| ८. | किनवट (जि.नांदेड) | नांदेड, परभणी, हिंगोली |
| ९. | देवरी (जि.गोंदीया) | भंडारा, गोंदिया |
| १०. | चंद्रपूर | चंद्रपूर |
| ११. | गडचिरोली | गडचिरोली |
| १२. | नागपूर | नागपूर, वर्धा |

❖ **कर्ज योजनांसाठी पात्रता अटी** :-

१) तहसील किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)

२) तहसील कार्यालयाकडील उत्पन्न दाखला उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण भागासाठी रु. ९८,०००/- आहे. तरी शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु. १,२०,०००/- एवढी आहे.

३) प्रकल्प कार्यालयाकडील सुशिक्षीत बेरोजगार दाखला.

४) शाळेचा दाखला (लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी)

५) कोणतेही दोन जामीनदार- १.नोकरी करणाऱ्याचे कार्यालय प्रमुखाच्या सहीचे कर्जवसुली हमीपत्र अद्यावत पगार दाखला. २.शेतकरी असल्यास ७/१२ उतारा.

६) इतर बँकाकडून / संस्थेकडून कर्ज घेतल्या नसल्याचा नाहरकत दाखला.

७) व्यवसायासाठी जागा- अ) स्वत:ची असल्यास घरपट्टी ब) भाडयाची असल्यास करारनामा.

८)व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत /नगरपालीका नाहरकत दाखला / दुकाने अधिनियमाखालील परवाना.

९) व्यवसायाचा अनुभव प्रशिक्षण दाखला.

१०) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहित्याचे कोटेशन

११) व्यवसाय प्रकल्प अहवाल.

१२) रेशनकार्डची झेरॉक्स.

१३) स्वत:चा हिस्सा म्हणून भरावयाची १०% सहभाग रक्कम, स्वत:च्या बँक खात्यात शिल्लक असल्याचा दाखला.

१४) वाहनासाठी - अ) वाहन चालविण्याचा परवाना.
ब) बॅच व परमीट
क) प्रवासी वाहतूक परवाना.

---

**बचतगट / सहकारी संस्थासाठी आवश्यक कागदपत्रे**

१. बचतगट /सहकारी संस्थाचे नोंदणी प्रमाणपत्र
२. बचतगट /सहकारी संस्थाचे सर्व सभासदाची यादी, त्यांचे रेशकार्ड व जातीचे दाखले
३. बचतगट /सहकारी संस्थाचे कमीत कमी सहा महिण्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट
४. ग्रामपंचायत / नगरपालीका नाहरकत दाखला
५. जामीन राहण्यासाठी अध्यक्ष व सचिव यांचे ७/१२ उतारे
६. जो व्यवसाय करावयाचा आहे त्याचे सर्व साहित्याचे कोटेशन
७. सहकारी संस्थांचे तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल.

- **कोणत्याही योजनेसाठी अनुदान नाही.**

❖ **अधिकृत भाग भांडवल :- एकूण रुपये २०० कोटी व भरणा झालेले (पेड-अपकॅपीटल) भाग भांडवल :-**

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्या अनुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.३१/०३/२०१५ पर्यंतचा अंदाजपत्रकात केलेली मागणी, शासन तरतूद, महामंडळास प्राप्त रक्कम व कमी प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपये लाखात)

| **सन** | **५१% राज्य शासन हिस्सा** | | | | **४९% केंद्र शासन हिस्सा** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रीकय मागणी | शासनाने केलेली तरतूद | **महामंडळास प्राप्त रक्कम** | कमी प्राप्त रक्कम | शासन निर्णयानुसार केलेली अंदाजपत्रीकय मागणी | शासनाने केलेली तरतूद | **महामंडळास प्राप्त रक्कम** | कमी प्राप्त रक्कम | **महामंडळास एकुण प्राप्त रक्कम** |
| १९९८-१९९९ | ५००.०० | ५००.०० | ५००.०० | - | - | - | - | - | ५००.०० |
| १९९९-२००० | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | - | - | - | - | - | १०००.०० |
| २०००-२००१ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २००१-२००२ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २००२-२००३ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २००३-२००४ | ७१७.१६ | ७१७.१६ | ७१७.१६ | - | ५२.०० | ५२.०० | ५२.०० | - | ७६९.१६ |
| २००४-२००५ | २०००.०० | ११०.०० | ११०.०० | १८९० | १०५.०० | - | - | १०५.०० | ११०.०० |
| २००५-२००६ | ३८९०.०० | २५०.०० | - | ३८९० | - | - | - | - | - |
| २००६-२००७ | ५८९०.०० | ३७७.३२ | ५०.०० | ५८४० | १५३.०० | - | - | १५३.०० | ५०.०० |
| २००७-२००८ | ७८४०.०० | ४००.०० | ४००.०० | ७४४० | ३८४.०० | - | - | ३८४.०० | ४००.०० |
| २००८-२००९ | ४६.०० | ०.०० | ४६.०० | ७४४० | ३८४.०० | - | - | ३८४.०० | ४६.०० |
| २००९-२०१० | ४००.०० | ४००.०० | ४००.०० | ११५० | - | - | - | - | ४०० |
| २०१०-२०११ | २६५०.०० | १५००.०० | १५००.०० | १५० | - | - | - | - | १५००.०० |
| २०११-२०१२ | १०००.०० | ८५०.०० | ८५०.०० | १५० | - | ३००.०० | ३००.०० | - | ११५०.०० |
| २०१२-२०१३ | २२९६.०० | १०००.०० | ८००.०० | | ४५२७.०० | - | - | ४५२७.०० | ८००.०० |
| २०१३-२०१४ | १०००.०० | १०००.०० | ४११.०० | ५८९.०० | १०००.०० | - | - | १०००.०० | ४११.०० |
| २०१४-२०१५ | १०००.०० | १०००.०० | ५७५.०० | ४२५.०० | १०००.०० | - | - | - | - |
| २०१५-२०१६ | | | ००.०० | | | | ००.०० | | ००.०० |
| **एकूण प्राप्त भागभांडवल :-** | | | **७३५९.१६** | - | - | - | **३५२.००** | | **७७११.१६** |

❖ **एन.एस.टी.एफ.डी.सी.नवी दिल्ली यांचेकडून त्यांच्या कर्ज हिस्साचा ७५% प्राप्त झालेल्या निधीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सन | प्राप्त निधी (रु.लक्ष) | विनियोग केलेला निधी (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | ३१/०३/२००१ पर्यंत | १३१८.९६ | १३१८.९६ |
| २ | २००१-२००२ | ४०.०० | ४०.०० |
| ३ | २००२-२००३ | ०.०० | ०.०० |
| ४ | २००३-२००४ | १४९.७५ | १४९.७५ |
| ५ | २००४-२००५ | ४३६.८३ | ४३६.८३ |
| ६ | २००५-२००६ | ५६१.०२ | ५६१.०२ |
| ७ | २००६-२००७ | १०४३.१२ | १०४३.१२ |
| ८ | २००७-२००८ | ५३४.१७ | ५३४.१७ |
| ९ | २००८-२००९ | ३५५.५० | ३५५.५० |
| १० | २००९-२०१० | ८०९.२५ | ५३३.१८ |
| ११ | २०१०-२०११ | १६८२.३६ | ७८२.७८ |
| १२ | २०११-२०१२ | ०.०० | ६५४.७५ |
| १३ | २०१२-२०१३ | ०.०० | २०९.२२ |
| १४ | २०१३-२०१४ | १०२७.२४ | ९६.३० |
| १५ | २०१४-२०१५ | ०.०० | ३२९.०४ |
| १६ | २०१५-२०१६ | ०.०० | ४०५.७६ |
| **एकुण** | | **७९५८.२** | **७४५०.३८** |

❖ **शबरी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार निर्मिती कर्ज योजनांसाठी पात्रता अटी योजनाची माहीती :-**

**अ) राष्ट्रिय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.) पुरस्कृत मुदत कर्ज योजना -**

**वित्तीय विगतवारी** i) एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा ७५%किंवा८५%
ii) शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा १५%किंवा १०%
iii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग १०%किंवा ५%

सदर योजना अंतर्गत प्रवासी वाहने, ट्रक्टर टॉली, हेवी ट्रक, जनरल स्टोअर, मालवाहू रिक्षा, किराणा दुकान, दुग्ध व्यवसाय,ढाबा, ऑटो वर्कशॉप, विटभट्टी, मिनीट्रक लहान व मोठा, सिमेंट मिक्सर मशीन इत्यादीचा समावेश आहे.

**ब) राष्ट्रिय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली पुरस्कृत महिला सशक्तीकरण योजना :-**

**वित्तीय विगतवारी** i) एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा ८०%
ii) शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा २०%
iii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग निरंक

सदर योजना अंतर्गत दुग्ध व्यावयाय घरगुती खानावळ, एस.टी.डी.बुथ, पिठ गिरणी, वडापाव, फळे व भाजीपाला, चहा, थंड पेय इत्यादीचा समावेश आहे.

**क) राष्ट्रीयकृत बँक सहकार्याने कर्ज योजना :-**

रुपये ५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा

| | | |
|---|---|---|
| वित्तीय विगतवारी | i) राष्ट्रीयकृत बँक .कर्ज हिस्सा | ७५% |
| | ii) शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | २०% |
| | iii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग | ५% |

रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त प्रकल्प मर्यादा

| | | |
|---|---|---|
| वित्तीय विगतवारी | i) राष्ट्रीयकृत बँक .कर्ज हिस्सा | ७५% |
| | ii) शबरी महामंडळ मार्जीन कर्ज हिस्सा | १५% |
| | iii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग | १०% |

सदर योजने अंतर्गत लाभार्थींच्या निवडी नुसार व बँकेच्या सहमतीने कर्ज योजना देण्यात येते.

## ❖ दि.३१.०३.२००८ पर्यंत थकीत कर्ज माफ केले.

- शासन निर्णय क्र.कमायो-२००९/प्रक्र.५२/का.३ आदिवासी विकास विभाग, मुंबई दिनांक-८ डिसेंबर, २००९ व शासन पत्र क्र.कमायो-२०११/प्रक्र.७१/का.३ आदिवासी विकास विभाग, मुंबई दिनांक-१ ऑगष्ट २०११ अन्वये शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार योजनांची लाभार्थींचे दिनांक-३१.०३.२००८ अखेर थकीत असलेल्या कर्जास माफी दिलेली आहे.

- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संचालक मंडळाचे दिनांक-३०.०५.२०१२ चे सभेतील ठराव क्र.-२ अन्वये शासन निर्णयाप्रमाणे कर्ज माफी रक्कम रु.२३,२६,९४२९३/- व्याजा सहीत मंजुरी देण्यात आली आहे

| अ.न. | शाखा कार्यालय | लाभार्थी संख्या | मुद्यल | व्याज | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपुर | १६५ | ९१६९९७६ | ३०६९५०१ | १२२३९४७७ |
| २ | देवरी | १५३ | ८६८८७३५ | ३२८२३९६ | ११९७११३१ |
| ३ | धारणी | १७० | १०५८८९१५ | ३२६९४१० | १३८५८३२५ |
| ४ | गडचिरोली | २१० | १३५२४५८६ | ४२४५१२९ | १७७६९७१५ |
| ५ | जव्हार | २७८ | १३७८०६७७ | ४०२२५९८ | १७८०३२७६ |
| ६ | जुन्नर | २६५ | १८२९४४७१ | ५४३८१९७ | २३७३२६६८ |
| ७ | किनवट | ९९ | ४२७६२१८ | १६५५४०५ | ५९३१६२४ |
| ८ | नागपुर | ३५२ | १७१०५९०७ | ५६२२८६३ | २२७२८७७१ |
| ९ | नंदुरबार | ६५४ | ३५९९९७७९ | ८०५८३९३ | ४४०५८१७२ |
| १० | नाशिक | ५८२ | २६१९८११४ | ७०२५३८१ | ३३२२३४९५ |
| ११ | यावल | ११९ | ३८१७७८० | ११८३५३२ | ५००१३१२ |
| १२ | यवतमाळ | ४४२ | २०१०६८९३ | ४२६९४३५ | २४३७६३२८ |
| | एकुण | ३४८९ | १८१५५२०५१ | ५११४२२४१ | २३२६९४२९३ |

❖ **शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची एकूण मंजूर कर्मचारी आकृतीबंध :- ७२ पदे.**

शासन निर्णय क्र.आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३ मुंबई दि.१३ डिसेंबर, १९९९ अन्वये महामंडळाची पदे निर्माण करण्यात आलेली आहे.

**मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांचा तपशील**

| **अ.क्र** | **संवर्ग** | **मंजुर पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|
| **(१)** | **२** | **३** | **४** | **५** |
| I | गट (ब) | | | |
| १ | व्यवस्थापक | १३ | ५ | ८ |
| II | गट (क) | | | |
| १ | उप व्यवस्थापक | १ | १ | ० |
| २ | लेखापाल | १३ | ७ | ६ |
| ३ | निरीक्षक | १२ | ० | १२ |
| ४ | लघुटंकलेखक | १ | ० | १ |
| ५ | वरीष्ठ सहाय्यक | २ | १ | १ |
| ६ | रोखपाल | १ | ० | १ |
| ७ | लिपीक नि संगणक सहाय्यक | १४ | ३ | ११ |
| ८ | वाहन चालक | १ | ० | १ |
| III | गट (ड) | | | |
| | शिपाई | १४ | ० | १४ |
| | **एकूण** | **७२** | **१७** | **५५** |

.